<u>*राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :- ४५५/२०२२/अहमदनगर**

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| श्री. नानासाहेब नागुजी खंडागळे<br>रा. मु.पो. लोणी खु,<br>ता. राहाता, जि. अहमदनगर | प्रबंधक,<br>प्रवरा इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्स, मु. पो. लोणी बु. ता. राहाता, जि. अहमदनगर |

**<u>सुनावणी दिनांक ०३/०८/२०२३</u>**

तक्रारदार यांनी दिनांक २१/०९/२०२२ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ०३/०८/२०२३ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित असुन विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

२) तक्रारदार यांनी दिनांक २१/०९/२०२२ रोजीच्या तक्रार अर्जात नमुद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार माहिती उपलब्ध करुन दिली नाही व आयोगाच्या आदेशाचे पालन केलेले नाही.

३) आयोगाने द्वितीय अपील क्रमांक ३३५५/२०१९/अहमदनगर संदर्भात दिनांक ०५/०४/२०२२ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, प्रवरा इंन्स्टिटयुट ऑफ मेडीकल सायन्सेस, लोणी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत तक्रारदारास त्यांच्या दिनांक ०२/०३/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर तक्रारदारास त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन माहिती विनामूल्य व्यक्तीश: पुरवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा."

४) सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व प्रस्तुत प्रकरणी आयोगासमोर उपलब्ध असलेली कागदपत्रे विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार तक्रारदार यांना दि. २५/०७/२०२२ व दि १८/०८/२०२२ च्या पत्रान्वये अवलोकनासाठी बोलविले होते. परंतु सदरचे पत्र निर्गमित केल्याबाबत आयोगास कोणताही पुरावा सादर केला नाही. त्यामुळे सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी निर्गमित केल्याचे गृहित धरता येणार नाही. तक्रारदार यांनी मागणी केलेली माहिती ही त्यांच्या स्वत:च्या वेतन व सेवापुस्तकाबाबत असल्यामुळे ती माहिती देय होते. सदरची माहिती जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक यांनी पुरविली नसल्याचे दिसुन येते.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान प्रबंधक, प्रवरा इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्सेस, लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर यांनी आयोगाने द्वितीय अपिल क्र. ३३५५/२०१९/अहमदनगर संदर्भात दि. ०५/०४/२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशातील मुद्या क्र. १ ची अंमलबजावणी आयोगाचे आदेश प्राप्तीपासून १५ दिवसांच्या आत करावी.

२) वरील निर्देशांसह सदरची तक्रार क्रमांक ४५५/२०२२/अहमदनगर निकाली काढण्यात येत आहे.

जा.क्रं. ओ-२९०

22 FEB 2024

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक